# प्रकरण पाचवे

## कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राजकारण

# प्रकरण ५ वे

# कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राजकारण

## प्रस्तावना:

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी कृषी औद्योगिक समाज या प्रांतात स्थापण्याचा निर्धार केलेला होता. त्यास राष्ट्रीय योजनेचाही पाठिंबाच होता. या नव्या प्रकारच्या ग्रामीण विकासात शेतीचा विकास शेतीस पाणीपुरवठा सुधारलेले बी-बियाणे आणि खते, पतपुरवठा शेती मालास योग्य बाजारपेठ आणि त्यातील काही पिकांवर औद्योगिक प्रक्रिया वगैरे गोष्टी सहकारी संस्थांच्या व स्थानिक शासनाच्या मार्फत करण्याचा त्यांचा विचार होता. म्हणून "सहयाद्रीचे वारे" या आपल्या पुस्तकात ते या सर्व प्रक्रियेस ते विकासाचे राजकारण म्हणून संबोधतात. कारण राजकारण हे सत्तास्पर्धे पुरतेच मर्यादित नसून त्याचा उद्देश देशातील प्रत्येक क्षेत्राचा सर्वांगिन विकास करणे हा आहे असे त्यांचे मत होते.[१]

राजकारण असलेल्या राजकीय नेत्यांच मुख्य कार्य सत्ता मिळवणे हे नसून विकासाच्या कामात शासन व जनता यांच्यात दुवा म्हणून काम करण्याचे आहे. त्याच प्रमाणे शासनाला जनतेचा पाठिंबा मिळवून देणे. शासनाच्या विविध योजना जनते-पर्यंत नेऊन त्यांची व्यवस्थित अंमलबजावणी होते की नाही हे पाहाणे, त्यात सुधारणा घडवून आपणणे ही राजकीय नेत्यांची

कामे असतात. त्यातूनच त्यांच्या नेतृत्वाची जडणघडण होते. नव नवे समर्थक मिळविता येतात. राजकीय पुढा-यांना त्यातून पाठीराखे मिळतात. त्यांचे प्रभाव केंद्र तेथे निर्माण होते. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीतून आणि पंचायत राज्य संस्थातून अशा प्रकाराने नवे नेतृत्व पुढे आले. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकही त्यास अपवाद नाही.[२]

<u>कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने केलेले विकासाचे कार्य:</u>

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने गेल्या २५ वर्षात सहकारी पध्दतीने शहरी व ग्रामीण पातळीवरील शेतक-यांना त्यांच्या आर्थिक विकासाकरिता अल्प व मध्यम मुदतीची कर्जे मोठ्याप्रमाणात दिली आहेत. त्याच बरोबर सुधारीत बी-बियाणे, शेतीची अल्पजीवी कर्ज योजना तसेच विहिरीसाठी कर्ज वाटप करण्यात आले.[३]

बँकेने जिल्हयातील खरेदी विक्री संस्थांना, मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा केला. तसेच शेतीमालाला किफायतशीर बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रक्रिया करणा-या म्हणजे साखर कारखाने, तसेच सुतगिरण्या, तेलगिरण्या, भातगिरण्या, शेतीमालावर प्रक्रिया करणा-या संस्थांना त्यांच्या खेळत्या भांडवलासाठी कर्जपुरवठा केलेला आहे. तसेच बँकेने रोजगार निर्मितीच्या दृष्टीने औद्योगिक संस्थांना सुध्दा कर्ज पुरवठा केला तसेच बिगरशेती संस्थानाही त्यांच्या विकासासाठी कर्ज पुरवठा केला. तसेच पाणी पुरवठा संस्था, दूध उत्पादक

संस्था यानाही कर्ज पुरवठा केला. जिल्हयातील अतिशय गरीब लहान शेतकरी शेतमजूर, दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी वेगवेगळ्या प्रकारे पतपुरवठा केला. तसेच काही बाबींना खास अर्थ सहाय्य केले. जिल्हा मध्यवर्ती बँकेने जिल्हयातील सहकारी चळवळ सर्व स्तरावर सुदृढ, प्रबळ व निकोप वाढावी व तिच्या मार्फत समाजातील सर्व घटकांना त्यांच्या उन्नतीसाठी कर्जपुरवठा करून अनेक विकासाची कार्ये केली आहेत. यामुळे ग्रामीण भागात विकासाचे नवे पर्व सुरू झाले. याच काळात सहकारी क्षेत्रातील कृषि औद्योगिकरणाची सुरुवात झाली होती.[४]

## २. राजकारण व सहकार यातील संबंध:

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ व राजकारणाचा एकत्रित इतिहास पाहिल्यास असे दिसून येते की मोठे आर्थिक व्यवहार करणारी सहकारी संस्था ही प्रचंड आर्थिक व सामाजिक शक्ती आहे. राजकारणात प्रस्थापित होण्यासाठी ही आर्थिक व सामाजिक शक्तीची गरज असते. शक्ती सहकारातून मिळवता येत त्यामुळे सर्वसाधारणत: प्रत्येक राजकीय कार्यकर्ता आपल्या प्रभावाखाली किती सहकारी संस्था आहेत यावरून राजकीय शक्तीचे गणित मांडतो. महाराष्ट्राच्या राजकारणात झालेली प्रमुख स्थित्यंतरे पाहिल्यास त्यामध्ये साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, जिल्हा सहकारी बँका व राज्य भूविकास बँक आणि प्रमुख खरेदी विक्री संघ या संस्थातील प्रमुख व्यक्तीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग असलेले दिसून येते. आजवर सहकारी संस्था व सहकारी संस्थेच्या सभासदाचे

कल्याण हे उद्दिष्ट दुय्यम होऊन सहकारी संस्थेच्या नेतृत्वाची विविध स्वरूपाची महत्वकांक्षा पूर्ण करणे हेच प्रमुख उद्दिष्ट झाले आहे.[५]

सहकारी संस्था या राजकीय सत्तेचे साधन म्हणून वापरल्या जातात. अलिकडे शिक्षण समाजकारण अर्थकारण अशा सर्व क्षेत्रात राजकारणाचा स्पर्श झालेला आहे. त्यामुळे सहकार हे राजकारणाचे मूळ आहे. सहकार व राजकारण यात मुलत: विसंवाद असण्याचे कारण नाही. याबाबत श्री. धनंजयराव गाडगीळ म्हणतात की "राजकारण्याने सहकारातून बाहेर जावे माझे मत नाही. पण आपण राजकीय पक्षांचा सभासद हे विसरून सहकारी संस्थेचा सभासद आहे हे लक्षात ठेवावे." सहकारी संस्थेतल्या कार्यामध्ये राजकीय पक्षातला अनुभव आणि कार्य हे उपकारक ठरते. तसेच राजकीय पक्षाच्या कार्यातही सहकारी क्षेत्रातला अनुभव उपयुक्त ठरतो. याबाबतीत महाराष्ट्रात वैकुंठभाई मेहता पासून वसंतदादा पाटीलापर्यंत अनेक तळमळीच्या व निरलस सहकारी कार्यकर्त्यांनी महत्वाचे कार्य केले आहे. खेड्यापाड्यात सर्व दूरवर पसरलेल्या गुणी आणि कर्तृत्ववान लोकामध्ये असणारा नेतृत्वगुण चेतवून लोकशाही कार्यपध्दतीने १00 नंबरी नेतृत्वाचे सोने सामाजिक राजकीय इ. क्षेत्रात उपलब्ध करून देण्याचे मौलिक कार्य सहकारी संस्था करित आहेत. त्यामुळे सहकार व राजकारण यांचा संबंध अतुट असा आहे तसेच सहकाराची सूत्रे हाती असणे हे राजकीय प्रभाव टिकवून ठेवण्याची गुरुकिल्ली आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नेतृत्व ही मुख्यता राजकीय पुढाऱ्याचे नेतृत्व होते. १९६0 पासून या बँकेमध्ये कोल्हापूरातील जवळ जवळ सर्वच महत्वाच्या पुढाऱ्यांनी काम केले होते असे आपणास दिसते.[६]

## १) कोल्हापूर जिल्हयातील राजकारणाचा आढावा:

कोल्हापूर जिल्हयातील राजकारणावर सुरुवातीच्या प्रजा-परिषदेच्या राजकारणाचा प्रभाव होता. सुरुवातीच्या काळातील भाई माधवराव बागल वसंतराव बागल, रत्नाप्प कुंभार वगैरे पुढा--यांचा प्रजा-परिषदेशी जवळचा संबंध होता. स्वातंत्र्यानंतर श्री. रत्नाप्पा कुंभार यांनी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला तर भाई माधवराव बागल, पी.बी. साळुंखे, नारवेकर वगैरे नेत्यानी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. जिल्हयाच्या राधानगरी भागात कम्युनिष्ठ पक्षाचा प्रभाव होता. १९५२ च्या निवडणूकीत लोकसभेची जागा खेडकर यानी जिंकली (अपक्ष) त्यानंतरच्या काळात शेतकरी कामगार पक्षाचा प्रभाव वाढला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये शेतकरी कामगार पक्ष हा प्रमुख पक्ष व भाई माधवराव बागल हे नेते होते. त्यामुळे या चळवळीत कोल्हापूर ढवळून निघाला. १९५७ च्या निवडणूकीत विधान सभेच्या निवडणूकीमध्ये प्रचंड विजय झाला. १९५६ साली श्री. यशवंतराव चव्हाण हे राज्याचे मंत्री झाले. त्यांनी हळूहळू साखर कारखान्याना उत्तेजन दिले. त्यातून श्री. वारणा सहकारी साखर कारखाना लि. वारणानगर याची १९५९ ला स्थापना झाली व पंचगंगा सहकारी साखर कारखान्याची १९५५ ला स्थापना झाली. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतक-याना विकासाची नवी दिशा दिसू लागली. महाराष्ट्रात हरितक्रांतीला सुरुवात झाली.

१९६० साली महाराष्ट्र राज्य निर्माण झाले आणि नव-निर्मितीचे नवे प्रयोग सुरु झाले. सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, सेवा सहकारी सोसायटया व पंचायतराज्य यांच्याद्वारे ग्रामीण भागाचा कायापालट करण्याचा नव्या सरकारचा प्रयत्न सुरु झाला. त्यामुळे कॉंग्रेस पक्षात नवीन कार्यकर्ते येऊ लागले त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाचा प्रभाव कमी होऊ लागला. १९६२ च्या निवडणूकीमध्ये कॉंग्रेसचा मोठा विजय झाला आणि त्या नेत्याच्या जवळ जवळ सर्व निवडणूकीमध्ये १ ते २ जागाचा अपवाद वगळता कॉंग्रेस पक्षाने आपले वर्चस्व कायम ठेवले.

कोल्हापूर जिल्हयाच्या राजकारणात श्री. रत्नाप्पा कुंभार गट हा प्रबळ होता कारण कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे पहिले अध्यक्ष होते. त्याचबरोबर पंचगंगा, सहकारी साखर कारखान्यातून निर्माण झालेले सहकारी संस्थाचे जाळे व त्यातून शिरोळ पंचायत संस्थेत त्यांचा प्रभाव वाढून कोल्हापूर जिल्हयात वर्चस्व होते. कोल्हापूर जिल्हयाच्या राजकारणात वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्याच विरोधी गट श्रेष्ठी गट यांच्यात चढाओढ राहिली. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक यांच्याशी रत्नाप्पा कुंभाराचे संबंध सवादपूर्ण नव्हते. म्हणून त्याचे मंत्रीपद हुकले. जिल्हयातून जाणा-या लोकसभेच्या २ जागापैकी १९६७ साली कुंभार यांचे पाठीराखे शंकरराव माने लोकसभेवर निवडून आले. १९६९ साली ज्यावेळी राष्ट्रपती पदाच्या निवडीवेळी कांग्रेस-मध्ये फुट पडली. त्यावेळी शंकरराव माने यानी यशवंतराव चव्हाण

यांचा आदेश झुगारून तुळशीदास जाधव, आ.के. गाडीळकर, यांच्याबरोबर श्री. गिरी याना पाठिंबा दिले. म्हणून १९७१ च्या लोकसभेच्या निवडणूकीत शंकरराव माने यांना कॉंग्रेसचे तिकीट मिळाले नाही. उलट इचलकरंजी लोकसभा मतदार संघातून त्यांचे विरोधक दत्ताजीराव कदम यांना तिकीट मिळाले. या निवडणूकीत विरोधी पक्षाचे त्र्य. शी. कारखानीस यांचा पराभव झाला. ही गटबाजी पुढे चालू राहिली.

१९७५ साली श्री. शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. हे रत्नाप्पा कुंभार यांचे राजकीय दृष्टया जवळचे होते. त्याकाळात रत्नाप्पा कुंभार यांचा उत्कर्ष झाला आणि नंतरच्या काळात ते राज्यमंत्री झाले. परंतु नंतरचे राजकारण हे अतिशय गोंधळाचे झाले. त्यांचे राजकीय विरोधक उदयसिंगराव गायकवाड मंत्रीमंडळात गेले. १९७५ ला वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. १९८० च्या विधान सभेच्या निवडणूकीत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार श्री. दिनकरराव यादव याचा पराभव झाला. १९८० च्या लोकसभा निवडणूकीत कॉंग्रेसचे दोन्हीही उमेदवार हे खासदार गटाचे होते. १९८० नंतर रत्नाप्पा कुंभार गटाऐवजी लोकसभा व विधान सभेच्या निवडणूकीत खासदार गटाचा वरचष्मा राहिला. पण जिल्हयातील सहकारी संस्था, साखरकारखाने व काही पंचायत संस्था यावर कुंभार गटाला महत्त्वाचे स्थान होते. त्यामुळे त्या गटाला पूर्णपणे राजकारणाबाहय करता आले नाही. थोडक्यात कोल्हापूर जिल्हयाच्या राजकारणामध्ये विरोधी पक्षाचा प्रभाव फारसा नव्हता

परंतु कॉंग्रेसच्या अंतर्गत गटबाजी हे विशेष आहे. आणि ही गटबाजी व राजकारण हे जिल्हा मध्यवर्ती बँकेत प्रवेश करते झालेले आपणास दिसून येते.[8]

४) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुका व राजकारण:

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर वर्चस्व प्रस्थापित करणे हे कोल्हापूर जिल्हयाच्या राजकारणासाठी आवश्यक आहे. कारण जिल्हा राजकारणाच्या दृष्टीने बँक हातात आहे त्यामुळे सुरुवातीपासून रत्नाप्पा कुंभार गट व महादेव श्रेष्ठी गट यांच्यात संघर्ष झालेला दिसून येतो. या संघर्षात कधी कुंभार गट वरचढ तर कधी विरोधी श्रेष्ठी खासदार गट विजयी झालेला दिसतो. सुरुवातीच्या काळात बँकेचे श्री. व्ही.जी. चव्हाण हे श्रेष्ठी गटांचे होते. खालील तक्ता क्र. १ वरुन कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या गटबाजी दर्शविते.

तक्ता क्र. १

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील गटबाजी

| साल | चेअरमन | कोणत्या गटाचे |
|---|---|---|
| १९५८-६१ | मा. व्ही.जी. चव्हाण | श्री.महादेव श्रेष्ठी गट |
| १९६१-६७ | मा.व्ही.के.चव्हाण-पाटील | श्री महादेव श्रेष्ठी गट |
| १९६७-६९ | मा.बी.एस. पाटील | श्री रत्नाप्पा कुंभार गट |

| साल | चेअरमन | कोणात्या गटाचे |
|---|---|---|
| १९६९-७० | मा. जी.एस्. भोगावकर | श्री. महादेव श्रेष्ठी गट |
| १९७०-७१ | मा. यु.एन्. गायकवाड | -"- |
| १०/३/७१ ते १३/१२/७१ | मा. जी.एस्. भोगावकर | -"- |
| १९७१-७३ | मा. एस्.एस्. बोंद्रे | -"- |
| १९७३ ते १७/१२/७३ | मा. मेजर डी.डी. निंबाळकर | श्री. रत्नाप्पा कुंभार गट |
| १९७३-७५ | मा. एन्.जी. पाटील | -"- |
| १९७५-७६ | मा. एच्.बी. पाटील | श्री. महादेव श्रेष्ठी/ खासदार गट |
| १९७६-७७ | मा. एस्.बी. पाटील | श्री. रत्नाप्पा कुंभार गट |
| १९७७-७८ | मा. वाय्.डी. पाटील | -"- |
| १९७८-७९ | मा. डी.डी. पाटील | -"- |
| १९७९-८० | मा. पी.बी. पाटील | -"- |
| १९८०-८१ | मा. डी.व्ही. मुद्राके | -"- |

| साल | चेअरमन | कोणत्या गटाचे |
|---|---|---|
| १९८१-८२ | मा. बी.के. पाटील | श्री.श्रेष्ठी खासदार गट |
| १९८२-८३ | डॉ. आर.एस्. संकपाळ | श्री. रत्नाप्पा कुंभार गट |
| १९८३-८४ | मा. ए.एस्. चौगुले | -"- |
| १९८४-८५ | मा. पी.बी. पाटील | -"- |

वरील तक्त्यावरून आपणास हे स्पष्ट दिसते की, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत वरील दोन गटात प्रखर गटबाजी होती आणि दोन्ही गटांचे बँकेवर वर्चस्व होते. गटबाजीच्या राजकारणा चालू असतानाच सहकारी बँकेमध्ये नवे राजकीय नेतृत्व घडत होते.[१]

### ५) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राजकीय नेतृत्व:

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कामामध्ये अनेक महत्त्वाच्या राजकीय पुढाऱ्यांनी भाग घेतला आहे. त्याचे नेतृत्व तेथे तयार झाले आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत काम केलेले तीन नेते महाराष्ट्र राज्यमंत्रीमंडळात सामील होऊन काम केले आहे. श्री. रत्नाप्पा कुंभार श्री.उदयसिंगराव गायकवाड, श्री. श्रीपतराव बोंद्रे हे होते.

तक्ता क्र २

राज्यातून निवडून गेलेल्या खासदारामध्ये ही बँकेचे माजी अध्यक्ष दिसून येतात ते खालील तक्ता क्र• २ मध्ये -

| अ•नं• | खासदार |
|---|---|
| १• | श्री• उदयसिंगराव गायकवाड |
| २• | श्री• शंकरराव डी• माने |
| ३• | श्री• दत्ताजीराव बी• कदम |
| ४• | श्री• बाळासाहेब एस्• माने |

याचप्रमाणे राज्याच्या विधान सभेच्या निवडणूकीत बँकेच्या माजी चेअरमन, व्हाईस चेअरमन संचालक यांचा आमदार म्हणून समावेश झालेला दिसतो तो खालील तक्ता क्र• ३ वरून स्पष्ट होते•

तक्ता क्र• ३

| अ•नं• | आमदार |
|---|---|
| १• | श्री• एम्•डी• श्रेष्ठी |
| २• | श्री• व्ही•के चव्हाण-पाटील |
| ३• | श्री• व्ही•डी• कदम |

| अ.नं. | आमदार |
|---|---|
| ४. | श्री. यु.एन्. गायकवाड |
| ५. | श्री. आर्.एस्. माने |
| ६. | श्री. एस्.एस्. बोंद्रे |
| ७. | श्री. बी.एस्. पाटील |
| ८. | श्री. एस्.बी. पाटील |
| ९. | श्री. डी.व्ही. मुद्राके |
| १०. | श्री. बी.वाय्. पाटील |

वरील आमदारांनी निवडून जाण्यापूर्वी जिल्हा मध्यवर्ती बँकेत कार्य केले आहे:[१०]

कोल्हापूर जिल्हा परिषदेची स्थापना १९६२ साली झाली. सुरुवातीच्या काळात जिल्हा परिषदेने महत्वाचे कार्य केले. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत काम केलेले अनेक पुढाऱ्यानी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होऊन अनेक महत्त्वाची कामे केलेली आहेत.

१. श्री. बाळासाहेब श. माने
२. श्री. डी.व्ही. मुद्राके [११]

यावरुन लोकसभा, विधान सभा तसेच जिल्हा परिषदेच्या राजकारणाच्या आखाड्यात जिल्हा मध्यवर्ती बँकेचे पुढारी चमकत असताना दिसतात.

जिल्ह्याचे राजकारणात कॉंग्रेसपक्ष प्रबळ झाला आणि या पक्षाने सर्व सहकारी संस्था व पंचायत समिती यावर नियंत्रण प्रस्थापित केले. त्यामुळे या भागात कॉंग्रेसचा पाया अगदी खोलवर रुजलेला आहे. कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदावर ही अनेक कॉंग्रेस नेते नियुक्त केले. काही नेते त्यांच्या राजकारणाची सुरुवात कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून करताना आढळतात. हे तक्ता क्र. ४ वरून स्पष्ट होते.

तक्ता क्र. ४

| अ.नं. | अध्यक्ष |
|---|---|
| १. | श्री. डी.व्ही. मुद्राळे |
| २. | श्री. एम्.डी. शेष्ठी |
| ३. | श्री. एस्.डी. माने |
| ४. | श्री. व्ही.के. चव्हाण-पाटील |
| ५. | श्री. यु.एन्. गायकवाड |
| ६. | श्री. एच्.बी. पाटील |
| ७. | श्री. बाळासाहेब श. माने |
| ८. | श्री. एस्.आर. पाटील |
| ९. | श्री. एस्.बी. पाटील [१२] |

वरील सर्व माहितीवरून आपणास असे म्हणता येईल की कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणात कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेत काम केलेल्या नेत्यानी महत्वाचे कार्य केले आहे. त्याना बँकेत मिळालेले प्रशिक्षण फायदयाचे ठरले. म्हणून बँकेवर नियंत्रण ठेवण्याचा दोन्ही गटाचा प्रयत्न आहे.

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेतील राजकारणाचा आपण आढावा घेतला यावरून आपल्या लक्षात येईल की विकासाचे राजकारण पुढे रेटीत असताना सत्तेचे राजकारण सुरु होते. हे राजकारण लोकशाहीमध्ये अपरिहार्य असते. या विकासाच्याराजकारणाचा भाग म्हणून कृषि औद्योगिक समाजाची स्थापना करण्याचे कार्य कोल्हापूरात झालेले दिसते. त्याचा फायदा कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना मिळाला नाही, कोल्हापूर हातकणंगले, शिरोळ, इचलकरंजी या विभागांना जास्त फायदा झाला. तर शाहूवाडी, राधानगरी, गडहिंग्लज, चंदगड वगैरे तालुके मागासलेले राहिले. कारण सर्वच भागात ही कृषि औद्योगिक प्रगतीचे लोन पोहोचले नाही. त्यामुळे जिल्ह्यात सुद्धा प्रादेशिक विकासाचा असमतोल झालेला दिसून येतो. हा असमतोल जिल्हा मध्यवर्ती बँक दूर करु शकली नाही. चंदगड, शाहूवाडी, गडहिंग्लज, राधानगरी या तालुक्याचे पुढारी बँकेचे अध्यक्ष झाले परंतु त्याच्या भागाच्या विकासाच्या दृष्टीने मागासच राहिला. सहकारी संस्थाचे आणि सहकारी प्रक्रिया उद्योगाचे जाळे तेथील कार्यकर्ते उभारु शकले नाहीत. त्यामुळे त्या भागाचा फारसा विकास झालेला नाही.[१२]

बँकेच्या सहकारी चळवळीच्या काही मर्यादा आहेत. बँकेचे अध्यक्ष श्री. पी.बी. पाटील जिराईत शेतीची सुधारणा पाटबंधारे मोठ्या प्रमाणात विकास, गरीबी वगैरे गोष्टी करण्याची सहकारी चळवळीची व बँकेची नाही. कारण त्याचे उद्देश मर्यादित आहेत. त्यामुळे दुसरे म्हणजे खालुन कार्यक्रमांचे जाळे उत्साही कार्य करीत नसेलतर बँकेचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत.[१४]

या विवेचनावरून हे लक्षात येईल की बँकेच्या धोरणाचा फायदा मुख्यत: ग्रामीण भागातील सधन बागायतदार शेतक-यांना झाला. आणि त्यामुळे बँकेच्या अस्तित्वामुळे त्यांची सामाजिक व राजकीय ताकद फार मोठ्या प्रमाणात वाढते. कोल्हापूर जिल्हयाच्या राजकारणात त्यांनी पकड केली. छोटे शेतकरी व धंदेवाले यांना बँकेच्या कामाचा फायदा झाला परंतु ते बँकेच्या कारभारावर कधीही नियंत्रण ठेऊ शकले नाहीत. बँकेच्या महत्त्वपूर्ण योगदानाला मान्य करिता असताना विकासाच्या प्रक्रियेमध्ये जो सामाजिक व राजकीय असमतोल निर्माण झाला आहे तो आपण लक्षात घेतला पाहिजे.

६) कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची वैशिष्टये:

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या राजकारणाची वैशिष्टये खालील प्रमाणे सांगता येईल.

पहिली गोष्ट म्हणजे या बँकेमधून एक नवे राजकीय नेतृत्व तयार झाले. या नव्या राजकीय नेत्यांनी आणि जिल्हयाच्या राज्यांच्या राजकारणात मोलाची कामगिरी बजावली आहे. या बँकेच्या राज कारणामध्ये विरोधी पक्षाचे स्थान नगण्य होते. शेतकरी कामगार

पक्षानेही बँकेच्या कामात फारसे लक्ष घातलेले नाही. म्हणून बँक सदैव काँग्रेस पक्षाच्या ताब्यात राहिलेली दिसून येते. परंतु काँग्रेसच्या ताब्यात राहिली तरी काँग्रेस अंतर्गत दोन तुल्यबळ संघर्ष प्रवण गटाच्यामध्ये सत्तेची स्पर्धा होती. कधी एक गट सत्तेवर तर दुसरा गट सत्तेवर येत असे. त्यातून गटबाजीला प्रेरणा मिळाली. गटबाजी हे जिल्हा बँकेच्या राजकारणाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ठ्ये आहे.

बँकेच्या राजकारणात गटबाजी असूनही बँकेची कामगिरी चांगलीच राहिली आहे. अनेक बाबतीत महाराष्ट्रात पहिला क्रमांक आहे.

१. जिल्हा मध्यवर्ती बँकेचा राज्यात ठेवी गोळा करण्यामध्ये पहिला क्रमांक आहे.

२. जिल्हा मध्यवर्ती बँकेचा कर्ज वसुलीमध्ये राज्यात पहिला क्रमांक आहे.

३. बँकेने ग्रामीण विकासाच्या कामात महाराष्ट्रात पहिला क्रमांक मिळवला आहे.

४. बँकेने बदलत्या परिस्थितीनुसार नव नवीन योजना आखून कार्यान्वीत करण्याचा प्रयत्न करते. उदा. पीकविमा योजना इ.

५. जिल्हयाच्या विकासाच्या कार्यात महाराष्ट्रात अग्रणी बँक आहे.

६. जिल्हा मध्यवर्ती बँक ही जिल्हयातील राजकारणाची पाठशाळा आहे.[१५]

तसेच कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या १९६० ते १९८७ या कारकिर्दीत झालेले चेअरमन व व्हाईस चेअरमन यांची माहिती खालीलप्रमाणे परिशिष्ठ क्र. १ मध्ये स्पष्ट केली आहे.

## परिशिष्ट - १

## कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पदाधिकारी १९६०/१९८५

### चेअरमन/व्हाईस चेअरमन कारकिर्द

| वर्ष | चेअरमन | व्हाईस चेअरमन |
|---|---|---|
| १९६०-६१ | श्री.व्ही.जी.चव्हाण | श्री.यु.एन्.गायकवाड |
| १९६१-६२ | श्री.व्ही.के.चव्हाण-पाटील | श्री.ए.एस्.देसाई |
| १९६२-६३ | | |
| १९६३-६४ | श्री.व्ही.के.चव्हाण-पाटील | श्री. ए.एस्. देसाई |
| १९६४-६५ | श्री.व्ही.के.चव्हाण-पाटील | श्री. ए.एस्. देसाई |
| १९६५-६६ | श्री.व्ही.के.चव्हाण-पाटील | श्री.ए.एस्. देसाई |
| १९६६-६७ | श्री. बी.एस्. पाटील | श्री. बी.ए. पाटील |
| १९६७-६८ | श्री. बी.एस्. पाटील | श्री. बी.ए. पाटील |

| वर्ष | चेअरमन | व्हाईस चेअरमन |
|---|---|---|
| १९६८-६९ | श्री.जी.एस्. भोगावकर | मेजर डी.डी. निंबाळकर |
| १९६९-७० | श्री. यु.एन्. गायकवाड | श्री. एस्.एस्. बोंद्रे |
| १९७०-७१ | श्री. जी.एस्. भोगावकर | श्री. एच्.बी. पाटील |
| १९७१-७२ | श्री. एस्.एस्. बोंद्रे | श्री. डॉ.आर्.एस्.संकपाळ |
| १९७२-७३ | | |
| १९७३-७४ | श्री. एन्.जी. पाटील | श्री. एस्.ए. पाटील |
| १९७४-७५ | श्री. एच्.बी. पाटील | श्री. डी.टी. पाटील |
| १९७५-७६ | श्री. एस्.बी. पाटील | श्री.आर्.टी. पाटील |
| १९७६-७७ | श्री. वाय्.डी. पाटील | श्री. एस्.आर. भांदिगरे |
| १९७७-७८ | श्री. डी.टी. पाटील | श्री. वाय्.डी. पाटील |
| १९७८-७९ | श्री. पी.बी. पाटील | श्री. आर्.एस्. देसाई |
| १९७९-८० | श्री. डी.व्ही. मुद्राळे | श्री. यु.एस्. पाटील |
| १९८०-८१ | श्री. बीके. पाटील | श्री.ए. आय. फरास |
| १९८१-८२ | श्री.डॉ.आर.एस्.संकपाळ | श्री. के.बी. किरूळकर |

| वर्ष | चेअरमन | व्हाईस चेअरमन |
|---|---|---|
| १९८२-८३ | श्री. ए.एस्. चौगुले | श्री. ए.आय्. फरास |
| १९८३-८४ | श्री. पी.बी. पाटील | श्री. यु.एस्. पाटील |
| १९८४-८५ | श्री. पी.बी. पाटील | श्री. यु.एस्. पाटील |

.....

## प्रकरण ५ वे

### संदर्भ

१· चव्हाण यशवंतराव — "सहयाद्रीचे वारे" मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या निवडक भाषणांचा संग्रह विनोदराव संचालक प्रसिद्दी विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई–१९६२, पृ.क्र.

२· डॉ.पाटील,एस्.जे· — "लोकल पटर्न ऑफ पॉलिटिक्स इन सांगली डिस्ट्रिक्ट" अप्रकाशित पीएच्.डी· थेसीस, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर १९८७, पृ.क्र· ७५·

३· गरूड शांताराम (सं) — "कृषि औद्योगिक समाजाची २५ वर्षे" प्रबोधन प्रकाशन इचलकरंजी,१९८५, पृ· क्र· ५७·

४· वार्षिक अहवाल १९८५–८६ — अध्यक्ष कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि·कोल्हापूर, पृ·क्र· ४,५,७, १०·

५· डॉ·पाटील जेएफ्· — सहकारातील आरिष्ट कारणे व उपाय प्रबोधन प्रकाशन इचलकरंजी, १९८९, पृ· ९·

६• डा•श्रीश्रीमाळ,वा•चु•          "सहकारी अर्थव्यवस्था" शिवाजी विद्यापीठ,प्रकाशन, कोल्हापूर,१९७९ पृ•क्र• २६,२७•

७• कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेस कमिटी ऑफीसकडून मिळालेली माहिती•

८• कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेस आय कमिटी ऑफीसकडून मिळालेली माहिती•

९• कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या ऑफीस कडून व कामगार युनियन अध्यक्षाकडून मिळालेली माहिती•

१०• कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या १९६० ते १९८५ मधील वार्षिक अहवालावरुन माहिती•

११• जिल्हा परिषदेच्या परिषद विभागाकडून मिळालेली माहिती•

१२• जिल्हा परिषदेच्या परिषद विभागाकडून मिळालेली माहिती•

१३• कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेस आय कमिटीच्या ऑफीसकडून मिळालेली माहिती व जिल्हा कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष कारकिर्द यादीतील माहिती•

१३• कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या १९६० ते १९८५ च्या आतील वार्षिक अहवालातील माहिती•

१४. गरूड शांताराम "कृषि औद्योगिक समाजाची २११ वर्षे" चर्चासभाचे उद्घाटन प्रसंगी मा. श्री. पी.बी. पाटील यांचे अध्यक्षीय भाषण प्र.क्र. २३ ते २८.

१५. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा वार्षिक अहवाल १९६० ते १९८५ मधील सर्व अहवालावरून माहिती.

१६. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सन १९६० ते १९८५ मधील सर्व वार्षिक अहवालावरून माहिती.

......